# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**
**प्रश्नपत्रिका एक--विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

रविवार, दिनांक २१ जुलै, २०१९
[वेळ : सकाळी १०-३० ते दुपारी १-००]
(एकूण गुण- १००)

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत

**गुण**

**प्रश्न क्र.१ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **२०**

हेडमास्तर श्री. नाईक मास्तर यांचा शाळेत दरारा असे. तसे ते शिस्तीचे कडे भोक्ते. या शिस्तप्रिय हेडमास्तरांनी माझ्या शाळेला चांगलीच शिस्त लावली. शाळेची दुसरी घंटा होताच ते हातात छडी घेऊन शाळेच्या दारात थांबत. अशा शिस्तीत मग कोण उशीरा येईल! असा त्यांचा दरारा.

श्री. नाईक हे मला इंग्रजी चौथीत इंग्रजी आणि इतिहास शिकवत. त्यात इंग्रजीचे 'रेन - मार्टिन' चे ग्रामर ते आवडीने शिकवत. ते सदानकदा वद्यार्थ्यांना समुपदेश करत. श्री. रायगावकर मास्तरांसारखे ते कधीही इतर सार्वजनिक कार्यात पडत नसत. आपण बरं अन् आपली शाळा बरी, हेच त्यांचं कार्य. त्यामुळे त्यांनी शाळेला शिस्त आणली आणि परीक्षेच्या निकालाच्या दृष्टीने त्यांनी शाळेची चांगली प्रगती केली.

औंधला शिकायला जाणार म्हणून मी श्री. नाईक मास्तरांना भेटलो. त्यांनी मला योग्य असं मार्गदर्शन केलं. शाळेत असतानाही त्यांचं माझ्यावर लक्ष होतं. शिस्तीच्या दृष्टीने कसं वागावे, जीवनात आपली प्रगती कशी करून घ्यावी, याबाबतीत त्यांनी केलेला हितोपदेश मी कधीच विसरू शकत नाही.

श्री, रायगावकर, देशपांडे या शिक्षकांनी तर मला संस्कारदृष्ट्या फारच उपकृत करून ठेवले आहे. कसे ते एक - दोन प्रसंग येथे उद्धृत करून स्पष्ट करतो.

कुस्तीसारख्या खेळात सुद्धा जात पात मानली जात असे. आमच्या गावातही आम्हां मुलांसाठी वेगळी तालीम होती. लहानपणी मी ब-यापैकी कुस्त्या करत असे. हंगामात कुस्त्या करून मी कधी खोबरे, तर कधी नारळ, तर कधी एखाद्या रूपयापर्यंत इनामे मिळवली आहेत. एक मिळाल्याचे आठवते.

असाच बाहेरगावी मी कुस्त्यांचा फड पहायला गेलो होतो. तेथे एका थोराड मुलाला, 'याला जोड, याला जोड' म्हणून फडात फिरवत होतो. दोन राऊंड मारूनही त्याला कुणी जोड उभा राहिला नाही. तेव्हा आमच्यातला एक म्हणाला, ' शंक-या उठतोस का ? धरतोस का कुस्ती त्या गड्याबरोबर?'

मी 'हा हा' म्हणत मैदानात गेलो आणि लढत करण्याची तयारी दर्शवली; पण मला कुणीतरी ओळखले आणि हटकले.

मी हिरमुसला होऊन माघारी गेलो. हा प्रसंग माझ्या मनाला लागला हे ओळखून रायगावकरांनी माझी समजूत घातली. म्हणाले, ' अरे, समाज अजून निद्रिस्त आहे. खेळात - मैदानात जात न पाहता कौशल्य पाहावे, हे अजून त्याला नीट समजले नाही. पण एक दिवस असा येईल की, हे सारे नष्ट होईल. तुम्हांलाही खेळात - स्पर्धेत मानाने बोलवले जाईल.'

असाच एक दुसरा प्रसंग...

शिमग्याच्या धुळवडीला आमच्या वस्तीतील प्रौढ वर्गात तमाशाचा फड उभा राहिला. त्या दिवशी प्रौढ साक्षरतेचा वर्ग बंद होता; पण रायगावकर मास्तरांना याची कल्पना नसल्याने ते नेहमीप्रमाणे वर्गाला भेट द्यायला आले. प्रौढ वर्गाच्या कंदिलाच्या प्रकाशात तमाशा चालला होता, ते पाहून रायगावकर चटकन परत फिरले. त्यांना पाहताच मी त्यांना आडवा गेलो. माझी मान खाली झाली होती, ते पाहून मास्तर म्हणाले. "अरे! आज धूलिवंदन! हे चालायचेच!" अन् मास्तर तसेच वाटेला गेले.

मग मास्तर मला दुस-या दिवशी बोलले, "शंकर! तू हे ध्यानात ठेव. जिथे प्रौढ साक्षरतेचा वर्ग चालतो, तुम्ही अभ्यास करता त्या विद्येच्या मंदिरात तमाशा कसा उभा...?"

सरांनी मला केलेला हा उपदेश मी कधीच विसरू शकत नव्हतो.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : -**

(अ) लेखकाला नाईक मास्तरांनी कशा प्रकारे मार्गदर्शन केले?

(ब) हेडमास्तरांनी लेखकाच्या शाळेला कशा प्रकारे शिस्त लावली ?

(क) रायगावकर मास्तरांना पाहून लेखकाची मान खाली का झाली ?

(ड) रायगावकर मास्तरांनी लेखकाची समजूत कशा प्रकारे काढली ?

(इ) रायगावकर मास्तरांनी शंकरला कोणता उपदेश केला ?

**प्रश्न क्र.२ गट "अ" मधील वाक्प्रचारांची गट "ब" मधील अर्थाशी समान जुळणी करा.** **१०**

| "अ" गट | "ब" गट |
|---|---|
| (अ) आस्वाद घेणे | (१) अस्वस्थ होणे |
| (ब) चलबिचल होणे | (२) भीती वाटणे |
| (क) सांत्वन करणे | (३) मन अस्थिर होणे |
| (ड) बैचेन होणे | (४) कबुली करणे |
| (इ) तरतूद करणे | (५) संकटांचा सामना करणे |
| (फ) साक्ष देणे | (६) हस्तगत करणे |
| (ग) गढून जाणे | (७) व्यवस्था करणे |
| (ह) संकटांना तोंड देणे | (८) गुंग होणे |
| (य) अंगावर शहारे येणे | (९) धीर देणे |
| (र) काबीज करणे | (१०) आनंद घेणे |

गुण

**प्रश्न क्र.३ पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचा वाक्यात उपयोग करा.** १०

| | |
|---|---|
| (अ) चंचल | (ब) वाचन |
| (क) वेळ | (ड) आळस |
| (इ) आरोग्य | (फ) पालवी |

**प्रश्न क्र.४ पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा.** २०

(१) शिरीष मधील तुम्हांला समजलेली गुणवैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

(२) काझीरंगा अभयारण्यातील प्राणिजीवनाचे वर्णन करा.

(३) जिज्ञासा ही शोधांमागील जननी आहे हे, 'दिव्याच्या शोधामागचे दिव्य' या पाठाच्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

(४) बंडूनानांच्या अंगी दृढनिश्चय हा एक अलौकिक गुण आहे. असे लेखक का म्हणतात?

(५) 'पक्षी जाय दिगंतरा' ही उक्ती आभाळातल्या पाऊलवाटा या पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(६) दाक्षिणात्य स्त्री व लिंबाचे झाड यांच्यामधील संबंध स्पष्ट करा.

**प्रश्न क्र.५ कोणत्याही एका पाठाच्या / कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३ ते ४ ओळींत लिहा.**

**(कोणतेही चार)** १०

**(अ)** 'ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) 'ऑलिंपिक व्हिलेज' ही संकल्पना स्पष्ट करा.

(२) ऑलिंपिक सामन्यांचा इतिहास स्पष्ट करा.

(३) ऑलिंपिक खेळांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(४) 'ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ' या पाठातून तुम्हांला कोणती प्रेरणा मिळते हे थोडक्यात सांगा ?

(५) ऑलिंपिकमध्ये यशस्वी झालेल्या भारतीय खेळाडूंचा आपल्या देशात कशा प्रकारे सन्मान केला जातो, यावर थोडक्यात तुमचे विचार लिहा.

**किंवा**

**(ब)** 'व्यायामाचे महत्त्व ' या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) 'व्यायामाचे महत्त्व' या कवितेतून तुम्हांला कोणता संदेश मिळतो ?

(२) 'व्यायामाचे महत्त्व' या कवितेतील भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(३) व्यायामाचे शरीराला होणारे फायदे तुमच्या शब्दांत लिहा.

(४) 'व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति | कार्य करण्याची ||' या पंक्तीतील तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(५) ' आरोग्यम् धनसंपदा' या उक्तीतील विचाराचा विस्तार करा.

गुण

**प्रश्न क्र.६ (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा.** ५

(१) Comedy
(२) Budget
(३) Encyclopedia
(४) Interpreter
(५) Passport
(६) Medal

**(ब) पुढीलपैकी कोणत्याही पाच संख्या अक्षरात लिहा.** ५

(१) ८३५०
(२) ३४० + २० = ३६०
(३) ७१५ - १५ = ७००
(४) ६० × १४ = ८४०
(५) ५२० ÷ १३ = ४०
(६) ७२.६

**(क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योग्य रूप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा.** १०

(१) कोणीतरी -------------- सतत धडपड करत असल्याचे पाहाण्यातच त्यांना अमाप सौख्य मिळत होते. ( संगीतशास्त्र )
(२) माहुताने ----------जरा खाली वाकायला लावले. ( वैजयंती )
(३) ऑलिंपीक -----------लागणारा खर्च फारच मोठा असतो. ( सामना )
(४) माझ्या यशात एक हिस्सा भाग ----------- असल्यास नव्याण्णव हिस्से भाग हा चिकाटीचा आहे. ( बुद्धिमत्ता )
(५) एकदा गावच्या ---------जत्रा ठरली. (लक्ष्मी )
(६) आपल्या लोकांत कोणत्याही ----------उत्तेजन नाही. ( कला )
(७) वसंतागमाला सगळेच पक्षी अनामिक ---------- आपल्या उत्तरेतल्या घरांकडे निघतात. ( ओढ )
(८) परीक्षेच्या निकालाच्या दृष्टीने त्यांनी -------- चांगली प्रगती केली. ( शाळा )
(९) घराभोवतीचा -----------झगमगाट पाहायला सारे गावच्या गाव लोटले. ( दिवा )
(१०) लोखंडी रूळावरून इंग्रज आगीनगाडी चालवणार, ही कल्पनाच लोकांना मोठी ---------वाटली. ( अचंबा )
(११) टाळ्यांच्या कडकडाटाने मी ------- आलो. ( भान )

**प्रश्न क्र.७ (अ) पुढीलपैकी कोणतेही तीन शब्द शुध्द करून लिहा.** ३

(१) मुर्हूत
(२) कलीयुग
(३) झूकझूक
(४) आस्वद

**(ब) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे वचन बदला.** ३

(१) सवय
(२) अक्षर

(३)तिजोरी (४) मोरपिस

गुण

**(क) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** ३

(१) दुष्काळ (२) अकल्पित

(३) प्रश्न (४) कडक

**(ड) कंसातील सूचनेप्रमाणे एक वाक्य बदलून लिहा.** १

(१) याबाबत मला काहीही म्हणायचे नाही. ( काळ ओळखा. )

(२) आजी, कुठं चाललीस? ( अधोरेखित शब्दाची जात ओळखा. )

---------------*-------------------*----------

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन--सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक २१ जुलै, २०१९

[वेळ : दुपारी २.१५ ते सायंकाळी ५.००]

(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)

(एकूण गुण- १००)

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

**प्रश्न क्र. १ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा.** **२०**

(अ) शहरातील वायुप्रदुषण चिंता आणि चिंतन
(ब) खेड्याकडे चला

**प्रश्न क्र. २ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा.** **२०**

(अ) हुंडा एक सामाजिक समस्या या विषयावर चर्चा करा.
(ब) विशुध्द पर्यावरण एक सामाजिक जबाबदारी यांविषयी चर्चा करा.

**प्रश्न क्र. ३ पुढीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा.** **३०**

(अ) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवाज्येष्ठता यादीबाबत परिपत्रक तयार करा.
(ब) महाराष्ट्रातील जिल्हा सैनिक, नाविक व वैमानिक मंडळांना राज्यशासनाची कार्यालये म्हणून घोषित करण्यांबाबतचे प्रसिद्धिपत्रक तयार करा.
(क) कनिष्ठ महाविद्यालयासाठी जादा तुकडी मान्यता प्रस्ताव शिक्षण संचालकाकडे सादर करा.

**प्रश्न क्र. ४ पुढीलपैकी प्रत्येक गटातून कोणत्याही पाच संज्ञांचे मराठी पर्याय द्या.** **१५**

**"अ" गट**

(अ) Purchase officer
(ब) Draftsman
(क) Embassy of India
(ड) Finance commission
(इ) Housekeeping section
(फ) Extension wing

**"ब" गट**

(अ) Juvenile Court
(ब) Ministry of Defense
(क) Market Sub-Committee
(ड) Session office
(इ) Rural Medical Relief Centre
(फ) Public Accounts Committee

गुण

"क" गट

(अ) Sub-section
(ब) Vocational School
(क) Ward
(ड) Registration department
(इ) Municipality
(फ) Control room

**प्रश्न क्र.५ खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा.** १५

(अ) A Judge may, by writing under his hand addressed to the President, resign his office.

(ब) The Supreme Court shall be a court of record and shall all the powers of such a court including the power to punish for contempt of itself.

(क) The law declared by the Supreme Court shall be binding on all courts within the territory of India.

(ड) All authorities, civil and judicial, in the territory of India shall act in aid of the Supreme Court.

(इ) The Comptroller and Auditor- General shall not be eligible for further office either under the Government of India or under the Government of any State after he has ceased to hold his office.

(फ) No person shall be eligible for appointment as Governor unless he is a citizen of India and has completed the age of thirty-five years.

-----------------------